## स्थिर दर रिपो (Repo) मार्च ३, २००३

## फेब्रुवारी २८, २००३

भारतीय रिझर्व्ह बँकेने भारत सरकारच्या तारीखबद्ध प्रपत्रे व ट्रेझर्स बिल्स साठी तरत्या दराच्या रिपो (Repo) लिलावाच्या ऎवजी एकदिवसीय स्थिर दर रिपो (Repo) ५% ने जाहीर केला आहे. लिलावात पात्र बँका व विक्रेत्यांशी आपली मागणीपत्रे प्रत्यक्ष अथवा निगोशीएटेड डीलिंग सिस्टम मार्फत मार्च ३, २००३ ला सकाळी १०.३० पर्यंत दाखल करावीत. (नमुना आर बी आय च्या www.rbi.org.in संकेत स्थळावर उपलब्ध) अर्ज अंशतः अगर पूर्णतः स्वीकारले जाऊ शकतील. मागणीदारांनी मार्च ३, २००३ रोजी दुपारी २.३० पर्यंत रक्कम भरावयाची आहे. भारतीय रिझर्व्ह बँक मार्च ४, २००३ रोजी पुर्नखरेदी करील.

रिव्हर्स रिपो च्या बाबतीत नेहमी प्रमाणे पात्र बँका व प्राथमिक विक्रेत्यांनी लिलावाच्या पद्धतीत मार्च ३, २००३ रोजी बोली सादर करावयाची आहे.

मार्च ४, २००३ पासून नेहमी प्रमाणे तरत्या दराच्या रिपो (Repo) चे लिलाव केले जातील.

**अल्पना किल्लावाला**
**महा व्यवस्थापक**

**प्रेस रिलीज २००२-०३ / ९०८**